N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नवी मुंबई  **P.S.**(ठाणे): खांडेश्वर  **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0250  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 24/09/2022 03:15 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन  **Date From** (दिनांक पासून): 16/09/2022

**Time Period** (कालावधी):  **Date To** ( दिनांक पर्यंत): 23/09/2022

**Time From** (वेळेपासून): 15:46 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 16:08 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 24/09/2022  **Time** (वेळ): 03:10 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 004  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 24/09/2022 03:15 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 04 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): सिडको कार्यालय, नविन पनवेल,ता पनवेल, जि रायगड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कामराज नारायण जांभळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1972  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with OKEN Scanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॉट नं 12, रोड नं6, सेक्टर 11, नवीन पनवेल,ता पनवेल जि रायगड ,खांडेश्वर,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॉट नं 12, रोड नं6, सेक्टर 11, नवीन पनवेल,ता पनवेल जि रायगड ,खांडेश्वर,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रकाश बालकदास मोहिले | | | 1. सिडको कार्यालय, नवीन पनवेल, व, वर्ग-1, ता पनवेल, जि रायगड,खांडेश्वर, नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. संजय हरिभाउ डेकाटे | | | 1. सिडको कार्यालय,नवी मुंबई,वर्ग-2, ता पनवेल, जि रायगड,खांडेश्वर,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | श्री. डेकाटे यांनी श्री.प्रकाश मोहिले यांनी सांगितलेप्रमाणे माझे कामासाठी माझेकडे रू. 15,000 / लाचे | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 15,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 24/09/2022 मी कामराज नारायण जांभळे, वय -50 वर्ष, व्यवसाय - सिव्हील कॉन्ट्राक्टर रा. प्लॉट नं. 12, रोड नं.6, सेक्टर 11, नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड समक्ष फिर्याद लिहून देतो की, (मो.9819984490) मी वरील ठिकाणचा कायमचा रहीवाशी असून नमुद ठिकाणी माझे कुटुंबासह राहत आहे. मी सिव्हील बांधकामाची कामे करीत आहे. मी सिव्हील कॉन्ट्रक्टर श्री. अरूण भुजबळ यांच्यासोबत सुमारे 15 वर्षापासून काम करीत असून त्यांच्याकडून मला सिडको प्रकल्पग्रस्त योजनेतील सब कॉन्ट्रक्टर सबंधीत काम अधिकारपत्रान्वये मिळतात. श्री. अरुण भुजबळ, सिव्हील कॉन्ट्रक्टर यांना नविन पनवेल येथील सिडको कार्यालयाच्या इमारतीच्या बाहेरील भिंतीचे दक्षिण -पूर्व भागाचे दुरुस्ती करण्याचे कामाचे कंत्राट कोटेषन नंबर 82/CIDCO/EE(PNL)2022.23 अन्वये दिनांक 23/08/2022 रोजी रू.2,88,986/- इतक्या रक्कमेस मिळाले होते. त्यानंतर श्री. अरुण भुजबळ यांनी सदर काम करणेबाबतचे अधिकारपत्र मला दिले आहे. त्याप्रमाणे मी सदरचे काम सुरू करून मुदतीत पुर्ण केले. मला श्री. अरूण भुजबळ यांनी दिलेल्या वर्कऑर्डर प्रमाणे मी नविन पनवेल येथील सिडको कार्यालयाच्या इमारतीचे बाहेरील भिंतीचे दक्षिण -पुर्व भागाचे दुरूस्तीचे काम एक महिण्याचे आत पुर्ण केले आहे. त्यानंतर सदर कामाचे बिल मंजुरीकरीता आवश्यक क्वॉलीटी रिपोर्ट मिळणेकरीता भिंतीचे दुरुस्तीकाम पुर्ण केल्याचे फोटो, चलन ईत्यादी कागदपत्रे सिडको कार्यालयात दिनांक 14/09/2022 रोजी जमा केलेली आहेत. सदर फाईलचा नंबर हा 242/2022 असुन कोटेशन नंबर 82/CIDCO/EE(PNL)2022.23 असा आहे. त्यानंतर सिडको कार्यालयाचे संबधित इंजिनिअर यांनी दुरूस्ती कामाची पाहणी करून त्यांनी सिडको कार्यालयात दुरूस्ती कामाचा इंन्टरनल क्वॉलीटी ऑडीट रिपोर्ट सादर केला. सदरचा रिपोर्ट मा. अधीक्षक, श्री. मोहिले साहेब यांच्याकडे अंतिम सहीसाठी सादर केला असल्याबाबत मला सिडको कार्यालयातुन माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे मी मा. अधीक्षक, श्री. मोहिले साहेब यांना सिडको कार्यालय, नविन पनवेल येथिल कार्यालयात जावून त्यांच्याषी माझ्या फाईल नंबर 242/2022 कोटेशन नंबर 82/CIDCO/EE(PNL)2022.23 बाबत चर्चा केली असता त्यांनी मला इंन्टरनल क्वॉलीटी



Scanned with OKEN Scanner

मुंबई

ऑडीट रिपोर्टवर सही करण्यासाठी माझ्याकडे रू. 15,000/- रुपयांची मागणी केली आहे. सदरची रक्कम मी त्यांना दिली नाही तर ते इंटरनल क्वॉलीटी ऑडीट रिपोर्टवर सही करणार नाहीत. मला मा. अधीक्षक, श्री. मोहिले यांच्या सिडको कार्यालय, नविन पनवेल यांनी मागणी केलेली रक्कम लाच असल्याने सदर लाचेची रक्कम त्यांना देण्याची माझी इच्छा नसुन त्यांच्याशी माझे कोणतेही आर्थिक व्यवहार नव्हते. म्हणून मी श्री. मोहिले, अधीक्षक अभियंता, सिडको कार्यालय, नविन पनवेल यांच्याविरूध्द लाचेसंबंधी कारवाई होणेकरीता दि. 15/09/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात जावून पोनि श्रीमती विद्युलता चव्हाण, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांचे समक्ष तक्रार दिली. मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीच्या सत्यता पडताळणी करणेकरीता पोनि श्रीमती विद्युलता चव्हाण, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी तहसिलदार कार्यालय, पनवेल जि.रायगड येथे पंचाची मागणी करण्यासाठी पत्र दिले. तसेच मला लाचेच्या तक्रारीची पडताळणी करीता दिनांक 16/09/2022 रोजी सकाळी 11.00 वाजे पावेतो नविन पनवेल, डिमार्ट येथे थांबून राहणेबाबत सांगीतले होते. त्याप्रमाणे दिनांक 16/09/2022 रोजी नविन पनवेल, डिमार्ट येथे थांबलो असतांना सकाळी 11.00 वाजताचे सुमारास पोनि श्रीमती विद्युलता चव्हाण ह्या सरकारी वाहन क्र.एमएच/12 आरवाय 7428 मला भेटले. त्यावेळी पोनि श्रीमती विद्युलता चव्हाण यांनी मला त्यांचेसोबत असलेले तहसिलदार कार्यालय पनवेल जि.रायगड येथील पंच साक्षीदार 1) श्री. प्रदीप श्रीमंत कांबळे, नायब तहसिलदार व पंच साक्षीदार क्र 2) श्री विजय विठठल मोरे, महसुल सहाय्यक यांची ओळख करून दिली. तसेच अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयातील पडताळणी पथकामध्ये भाग घेणारे अंमलदार पोहवा/जाधव, पोहवा/गायकवाड, पोशि/माने यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेच्या मागणीची सत्यता पडताळणी करण्याकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह मी व पंच क्र. 1 श्री. प्रदीप कांबळे असे माझ्या होंडा सिटी कार नं. MH01 AX3073 मध्ये बसून नविन पनवेल, सिडको कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. सिडको कार्यालयात पोहचल्यानंतर मी व माझे पाठोपाठ पंच नं. 1 श्री. प्रदीप कांबळे असे सिडको कार्यालयाचे दुस-या मजल्यावर आलो. त्यानंतर मी दुस-या मजल्यावरील अधिक्षक अभियंता, श्री. मोहिले यांच्या केबिनमध्ये गेलो. त्यावेळी श्री. मोहिले हे त्यांच्या केबिनमध्ये उपस्थित होते. केबिनमध्ये गेल्यानंतर मी श्री. मोहिले यांना नमस्कार करून माझ्या कामाच्या फाईल बाबत त्यांच्याकडे चर्चा करीत असतांना पंच क्र. 1 श्री. प्रदीप कांबळे हे श्री. मोहिले यांच्या केबीनमध्ये आले व त्यांनी लोकसेवक श्री. मोहिले यांना खांदा कॉलनी येथील एचडीएफसी बकेचे तिथे खड्डा पडलेला असल्याबाबत तक्रार केली. त्यावेळी लोकसेवक श्री. मोहिले यांनी पंच क्र. 1 श्री. प्रदीप कांबळे यांना खाली एक्झीक्युटीव्ह इंजिनियर रामोड साहेबांना भेटा असे सांगितल्याने पंच क्रं. 1 श्री. प्रदीप कांबळे हे श्री. मोहिले यांच्या केबीनमधुन बाहेर निघुन गेले. त्यानंतर लोकसेवक श्री. मोहिले यांनी माझी फाईल बघितली व त्यांना मिटींगला जायचे असल्याबाबत सांगून दुपारनंतर फोन करून येण्याबाबत मला सांगितले. त्यानंतर श्री. मोहिले व त्यांच्या पाठोपाठ मी केबिनमधून बाहेर आलो असता, पंच क्र. 1 श्री. प्रदीप कांबळे हे पसेजमध्ये उभे होते. त्यानंतर मी व माझे पाठोपाठ पंच नं. 1 श्री. प्रदीप कांबळे असे सिडको कार्यालयातुन बाहेर येवून माझे गाडीने पडताळणी पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर पोनि. विद्युलता चव्हाण यांनी मला व पंच श्री. प्रदीप कांबळे यांना घडलेली हकीकत विचारली असता, मी त्यांना वरील प्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि. विद्युलता चव्हाण यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण त्याबाबत खात्री केली. लोकसेवक श्री. मोहिले यांनी मला दुपारनंतर फोन करून बोलाविले असल्याने पोनि. विद्युलता चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे आम्ही सर्व नविन पनवेल येथील डिमार्ट समोरील रोडवर कोणास संशय येणार नाही असे थांबून राहिलो. त्यानंतर सुमारे 15.40 वा.चे सुमारास पोनि. विद्युलता चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे मी माझ्या मोबाईल फोन क्रंमाक 9819984490 वरून लोकसेवक श्री. मोहिले यांचा मोबाईल फोन क्रमांक 9987596903 वर फोन करून साहेब तुम्ही आलेत का ऑफीसला अशी विचारणा केली असता लोकसेवक श्री. मोहिले यांनी होकार देवून त्यांच्या कार्यालयात भेटण्यास बोलाविले. सदरचे फोनवरील संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले आहे. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू केल्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री. प्रदीप कांबळे असे शासकीय वाहनातून खाली उतरून माझ्या होडा सिटी कारमधून लोकसेवक श्री. मोहिले यांना भेटण्याकरीता नविन पनवेल, सिडको कार्यालयकडे गेलो. त्यानंतर मी व माझे पाठोपाठ पंच नं. 1 श्री. प्रदीप कांबळे असे नविन पनवेल येथील सिडको कार्यालयाचे दुस-या मजल्यावर आलो. त्यानंतर मी श्री. मोहिले, अधिक्षक अभियंता यांचे केबिनमध्ये गेलो असता, श्री. मोहिले हे त्यांचे केबिनमध्ये बसले होते. त्यावेळी मी श्री. मोहिले यांचे केबिनमध्ये जावून त्यांच्याशी माझ्या कामाच्या फाईल बाबत चर्चा केली. त्यावेळी मी श्री. मोहिले यांना सर सहकार्य करत जा...आता माझी तुमच्याकडं काम आहेत... हे बघा ही वर्कऑर्डर तुमच्याकडे आता येईल असे बोललो असता श्री. मोहिले हे ठिक आहे ते तुम्हाला दिल... तुम्हाला एकवेळा दोन वेळा रिलेशन दिल... त्याच्यानंतरही तुम्हाला समजत नसेल तर काय... असे मला बोलले. त्यावेळी मी त्यांना नाय असू दया काय नाय...काय असेल तर मला सांगा... मी करून टाकतो अस काय नाय.. असे बोललो असता श्री. मोहिले यांनी तुम्हाला सांगितले मागे असे बोलले. त्यावेळी मी त्यांना तुमचा व्यवहार नाय बरोबर... काय असेल ते क्लेअर बोला साहेब काय असेल तर मी करतो ना साहेब... आता बघा हे... असे बोललो. त्यावेळी श्री. मोहिले यांनी डेकाटे ने तुम्हाला सांगितल... डेकाटे ने तुम्हाला सांगितल तुम्ही काय तुमचं लक्ष नाय... असे बोलले. त्यावर मी श्री. मोहिले यांचेकडे ते किती काय दयायचे ते मला सांगा... मी करून टाकतो... अशी विचारणा केली. त्यावर श्री. मोहिले हे ते ते डेकाटेला ...डेकाटेला माहित आहे... असे मला बोलले. त्यावेळी मी त्यांना नाय तुम्ही सांगा... असे बोललो असता, श्री. मोहिले यांनी काय असेल तर..डेकाटेला माहित आहे.. असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाय नायतर तुम्ही परत काय म्हणाल की कामराजनी परत कमी दिले... असे नको व्हायला.. बर अजून एक काम आहे चार दिवसांनी परत तुमच्याकडे यायचं आहे... असे बोललो असता श्री. मोहिले यांनी त्यांचे वेगळे राहतील मला सांगितले. त्यावर मी त्यांना नाय त्यांचे वेगळे देईनच मी... पण यांचे किती दयायचे ते मला सांगाना फ्रन्कली बोला साहेब मला काम करायचं आहे. असे बोललो असता, श्री. मोहिले यांनी डेकाटेला सांगितल... असे मला बोलले. त्यावर मी त्यांना सांगितलय का तुम्ही... हा मग ठिक आहे.. सांगितलय ना तुम्ही... मग हरकत नाय... भेटू मग... डेकाटे आता येणार नाही ना ऑफीसला ... तुम्ही त्याला फोन करून सांगा ना.. कामराजला पाठवलय एवढं बोला ना तुम्ही... म्हणजे मी जातो असे बोललो असता, श्री. मोहिले यांनी ठिक आहे. असे बोलून त्यास होकार दिला. त्यानंतर मी त्यांना तुम्ही फोन करा थोड... आणि मी जावून भेटू आता डेकाटेला.. असे बोललो असता श्री. मोहिले यांनी भेटून घ्या असे मला सांगितले. त्यानंतर मी श्री. मोहिले यांना मी तुमच्याकडे आणुन देतो.. तुम्ही आता सांगा.. असे बोललो असता, श्री. मोहिले हे आता ... किती व्यवस्थित केल ते बघतो. असे बोलले. त्यावर मी त्यांना माझेकडे चारपाच हजार रूपये आहेत... एक पाच सात हजार रूपये आहेत किती पाहिजे ते सांगा असे बोललो असता श्री. मोहिले यांनी मला डेकाटे यांना भेटण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना डेकाटेकडे देवू ना... ठिक आहे... त्यांच्याकडे देतो असे बोललो असता श्री. मोहिले यांनी हा बोलून त्यांस होकार दर्शविला. त्यानंतर मी श्री. मोहिले यांच्या केबीनमधून बाहेर आलो. त्यावेळी पंच क्र. 1 हे पसेजमध्ये उभे होते. त्यानंतर मी तसेच पंच क्रं. 1 असे सिडको कार्यालयातून बाहेर येवून माझ्या होडा सिटी कारने पडताळणी पथक थांबले त्याठिकाणी परत आलो होतो. सदर पडताळणी दरम्यान मी लोकसेवक श्री. मोहिले यांच्याशी त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत बोलणी करता, लोकसेवक श्री. मोहिले यांनी श्री. डेकाटे यांच्याशी बोलणी करण्याबाबत मला सांगितले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यानुसार श्री. डेकाटे यांची भेट घेवून लाचेची सत्यता पडताळणी करणे आवश्यक आहे. परंतु दोन दिवस शासकीय सुट्टी तसेच माझे दिनांक 19/09/2022 रोजी वैयक्तिक काम असल्याने दिनांक 20/09/2022 रोजी श्री.डेकाटे यांची लाचेच्या मागणीची सतत्या पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.



Scanned with OKEN Scanner

दिनांक 20/09/2022 रोजी मी व दोन्ही पंच पोनि. विद्युलता चव्हाण यांच्या समक्ष हजर झालो. त्यावेळी पोनि. विद्युलता चव्हाण यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल फोन क्रमाक 9819984490 वरून श्री. डेकाटे यांचा मोबाईल फोन क्रमांक 9821224626 वर फोन केला. त्यावेळी मी श्री. डेकाटे यांना साहेब तुम्ही कुठे आहेत अशी विचारणा केली असता श्री डेकाटे यांनी मी ऑफीसला आहे. आता थोडासा साईडवर जावुन येतो 15-20 मिनीटांनी येतो असे मला सांगितले त्यानंतर त्यांनी फोन कट केला. सदचे फोनवर झालेले संभाषन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत केले आहे

त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह मी व पंच क्र 1 श्री प्रदीप कांबळे असे श्री डेकाटे यांना भेटण्याकरिता नविन पनवेल सिडको कार्यालयाकडे गेलो. मी सिडको कार्यालयात त्यांच्या केबीनमध्ये जावुन त्यांना भेटलो त्यावेळी श्री डेकाटे यांनी मला श्री मोहीले यांच्याबरोबर फोनवर चर्चा झाली असल्याचे सांगितले तसेच फोनवर श्री मोहीले यांनी 15000घेण्यास सांगितले असल्याने श्री डेकाटे यांनी फिफ्टीन असे मला सांगितले त्यावर मी त्यांना 15000असे विचारले असता श्री डेकाटे हा पंधरा बोलने का असे बोलले त्यावेळी मी त्यांना थोडस कमी करायला सांगा डेकाटे साहेब अशी विनंती केली असता श्री डेकाटे यांनी नाय करणार असे मला सांगितले त्यावेळी मी त्यांना सांगितले कि मोहीले साहेबांना बोला असे नका करुन कामराज गरीब माणुस आहे दहा घ्यायला सांगा , थोड कमी करा, दहा हजार रुपये घ्यायला सांगा 15000जास्त होत आहेत ओ डेकाटे साहेब असे बोललो त्यावेळी श्री डेकाटे मला देवुन टाका अच्छा रहेगा आगे के लिए असे बोललो त्यावेळी मी त्यांना डेकाटे साहेब तुम्ही बोलतात तर काय करणार तुमच म्हणंन आहे लास्ट त्याला पंधरा द्यायचे. असे विचारले असता श्री डेकाटे यांनी हो देवुन टाका असे सांगितले त्यावेळी मी त्यांना पंधरा हजार द्यायचे, किती द्यायचे विचारले असता डेकाटे यांनी मला देवुन टाका पंधरा हजार.. तो बोलला ना पंदरा हजार ठिक ये संपल. असे बोलले त्यावेळी मी त्यांना ठिक आहे चालल मग मी घेवुन येतो तुम्ही किती वेळ आहे असे विचारले असता श्री डेकाटे यांनी मी जेवण करुन अडीच वाजेपर्यत येतो ऑफीसला आल्यावर मी तुम्हाला फोन करतो. असे मला सांगितले त्यानंतर मी तसेच पंच क्र 1प्रदीप कांबळे असे सिडको कार्यालयातुन बाहेर येवुन पडताळणी करिता थांबले होते त्या ठीकाणी परत आलो.

सदर लाचेच्या पडताळणी दरम्यान मी नविन पनवेल येथील सिडको नोडल ऑफिसचे संरचनात्मक दुरुस्तीचे केलेल्या कामाचे बील मंजुरी करिता आवश्यक इंटरनल क्वॉलिटी ऑडीट रिपोर्टवर श्री मोहिले यांची स्वाक्षरी होणेकरिता श्री मोहीले यांनी सांगितल्यानुसार श्री डेकाटे यांनी माझ्याकडे 15000/-रुपये लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच श्री डेकाटे यांनी मला ते जेवण करण्यास जात असुन दुपारी 02.30 ऑफिसला आल्यानंतर फोन करतो असे सांगितले त्याप्रमाणे श्री डेकाटे यांचा फोन येण्याची वाट पाहण्याचा पोनि विद्युलता चव्हाण यांनी निर्णय घेतला परंतु बराच वेळ डेकाटे यांचा फओन न आल्याने पोनि विद्युलता चव्हाण यांनी मला श्री डेकाटे यांना फोन करुन ऑफिसला आले आहेत अगर कसे याबाबत विचारणा करण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी माझे मोबाईल फोन क्र 9819984490 वरुन श्री डेकाटे यांचा मोबाईल फोन नं क्र 9821224626 वर फोन केला त्यावेळी श्री डेकाटे यांनी आता जस्ट घरी पोहोचतोय असे मला सांगितले त्यावेळी मी त्यांना आता किती वाजता येणार आहेत अशी विचारणा केली असता डेकाटे यांनी मी पोन करतो आल्यावर तिकडे असे मला सांगितले त्यावर मी त्यांना बर तरी अर्धा तास लागेल का असे विचारले असता श्री डेकाटे यांनी नाही नाही जास्त जाईल एक सव्वा तास जाईल मी फोन करतो तुम्हाला तिकडे आल्यावर असे सांगितले व त्यानंतर फोन कट केला . फोनवर झालेले संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत केलेले आहे.

परंतु श्री डेकाटे यांचा फोन न आल्याने सदर लाचेची सापळा कारवाई दि 2/09/2022रोजी करण्याचे ठरविण्यात आले त्या अनुशांगाने पोनि विद्युलता चव्हाण यांनी पंचांना व मला दि 21/09/2022 रोजी सकाळी 10.30 वाजता ACB नवी मुंबई येथे हजर राहणेबाबत सुचना दिल्या.

पोनि विद्युलता चव्हाण यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी तसेच दोन्ही पंच दि 21/09/2022 व दि 22/09/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर होतो. परंतु त्यादरम्यान श्री डेकाटे यांचा मला फोन आला नाही.

आज दि 23/09/2022 रोजी पोनि विद्युलता चव्हाण यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी तसेच दोन्ही पंच अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयामध्ये हजर झालो. त्यावेळी मी पोनि विद्युलता चव्हाण यांना माझे मोबाईलवर श्री डेकाटे यांचा मिस कॉल आले होते म्हणुन मी माझे मोबाईलवरुन श्री डेकाटे यांना फोन केले असता श्री डेकाटे यांनी माझा फोन रिसिव्ह केले नाही अशी हकीकत पंचासमक्ष सांगितली त्यानंतर पोनि विद्युलता चव्हाण यांनी श्री डेकाटे यांच्या फोनची वाट पाहणार असल्याचे सांगितले तसेच श्री डेकाटे यांचा फोन आल्यानंतर सदरचे फोनवरिल संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करुन घेणेबाबत पोशि/ माने यांना सुचना दिल्या.

त्यानंतर 12.45वाच्या सुमारास श्री डेकाटे यांचे मोबाईल नंबर 9821224626 वरुन माझे मोबाईल फोन क्र 9819984490 वर फोन आला. श्री डेकाटे यांनी ते सिडको कार्यालय नविन पनवेल येथे येणार असुन तुम्ही कुठे आहेत याबाबत विचारणा केली त्यावेळी मी कामानिमित्त नेरे येथे असलेबाबत त्यांना सांगितले. त्यानंतर मी श्री डेकाटे यांच्याकडे श्री मोहीले यांच्याबाबत विचारणा केली असता श्री डेकाटे यांनी त्यांच्याबाबत खात्री करुन सांगतो असे मला सांगुन फोन कट केला सदरचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले आहे.

त्यानंतर 12.46वा च्या सुमारास श्री डेकाटे यांचे मोबाईल नंबर 9821224626 वरुन माझे मोबाईल फोन क्र 9819984490 वर फोन आला त्यावेळी श्री डेकाटे यांनी मोहीले साहेब व्हीजीट साठी बाहेर सातईडवर गेले आहेत ते एक दिड तासाने येतील असे सांगुन श्री डेकाटे यांनी मला अडीच वाजेपर्यत नविन पनवेल येथील सिडको कार्यालयात येण्यास सांगुन फोन कट केला. वरिलप्रमाणे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले आहे.

श्री डेकाटे यांनी मला अडीच वाजेपर्यत नविन पनवेल येथील सिडको कार्यालय येथे भेटण्यास सांगितले असल्याने सदर ठिकाणी सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे विद्युलता चव्हाण यांनी ACB नवी मुंबई कार्यालयातील पोनि शिवराज बेंद्रे तसेच पोलीस अंमलदार यांना त्यांचे केबिनमध्ये बोलावुन त्यांची मला व पंचांना ओळख करुन देवुन त्यांना सापळा पथकात समाविष्ठ करण्यात येत असल्याबाबत सांगितले.

त्यानंतर पोनि विद्युलता चव्हाण यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी तसेच दोन्ही पंच व सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार असे ACB, नवी मुंबई कार्यालयाचे इमारतीमधुन खाली उतरलो. त्यानंतर पोनि विद्युलता चव्हाण यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी तसेच दोन्ही पंच व सापळा पथक असे माझे होंडा सिटी कारमध्ये तसेच शासकिय वाहनांमध्ये बसल्यानंतर आम्ही सदर ठिकाणावरुन निघुन नविन पनवेल येथील डिमार्ट समोरिल रोडच्या कडेला येवुन थांबलो.

त्यानंतर पोनि विद्युलता यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे आम्ही श्री डेकाटे यांचे फोनची वाट पाहत थांबत होतो परंतु श्री डेकाटे यांचा फोन न आल्याने पोनि विद्युलता चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे माझे मोबाईल फोन क्र 9819984490 वरुन श्री डेकाटे यांचे मो नं 9821224626 वर फोन केला त्यावेळी मी श्री डेकाटे यांना ते कार्यालयात आले अगर कसे याबाबत विचारणा केली असता श्री डेकाटे यांनी ते दहा मिनीटांत नविन पनवेल येथील सिडको कार्यालयात पोहोचत असल्याचे मला सांगितले.



Scanned with OKEN Scanner

श्री डेकाटे यांनी लाचेची रक्कम 15000/-रुपये मागणी केल्यानुसार त्यांच्याविरुद्ध लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असुन सापळा कारवाई पुर्वी सापळा कारवाई शासकिय वाहनात करण्याचे ठरविले त्यानंतर शासकिय वाहनामध्ये सापळापुर्व कारवाई पुर्ण केल्यानंतर पोनि विद्युलता चव्हाण यांनी मला दोन्ही पंचांना सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर मी दोन्ही पंच व सापळा पथक असे माझे होंडा सिटीकारमध्ये व शासिय वाहनामध्ये बसुन सदर ठिकाणावरुन निघुन नविन पनवेल येथील सिडको कार्यालयाचे जवळ येवुन थांबले. त्यादरम्यान सदर ठिकाणी पो उप अधी. श्रीमती ज्योती देशमुख पोहोचल्या व त्यांनी देखील मला व सापळा पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डसह मी व पंच क्र 1श्री प्रदिप कांबळे, नविन पनवेल सिडको कार्यालयात आलो. त्यावेळी सापळा पथक देखील आमच्या पाठोपाठ सिडको कार्यालयाचे दुस-या मजल्यावर आले. मी श्री डेकाटे यांचे केबिनमध्ये गेलो असता पंच श्री प्रदीप कांबळे हे केबिनच्या दरवाजाजवळ थांबुन होते त्यावेळी श्री डेकाटे यांनी नाय न्यायची आहे.. नेतोना असे बोलत श्री डेकाटे यांनी त्यांचे उजव्या हातांच्या बोटांनी मला पैशाबाबत विचारणा केली त्यावेळी मी माझे उजवे हाताने माझेकडील लाचेची रक्कम रु 15000/- श्री डेकाटे यांचे समोर धरुन ह मोजुन घ्या हो.. मोजुन घ्या.. पंधरा हजार रुपये आहेत. असे बोलत लाचेची रक्कम मोजुन घेण्यास सांगितले. त्यावेळी श्री डेकाटे यांनी असतील बरोबर नाय हो असतील बरोबर असे बोलत लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन डाव्या हातात घेवुन नेसुस पँन्टचे पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी श्री डेकाटे यांना आणि मोहिले साहेबांना सांगा म्हणाव आता काम द्या तुझे पंधरा हजार रुपये पाहीजे होते दिले त्याला काम द्या म्हणाव कळल का. असे नको व्हायला असे सांगितले त्यानंतर काही वेळ बोलणे केल्यानंतर मी सापळा पथकास माझ्या डाव्या हाताने रुमाल तोंडावरुन फिरुन पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकाने श्री संजय डेकाटे यांना 16.08 वाजता पंचांसमक्ष लाचेच्या रकमेसह रंगेहात ताब्यात घेतले आहे. तसेच लोकसेवक श्री प्रकाश बालकदास मोहीले, अधिक्षक अभियंता यांना सिडको कार्यालक नविन पनवेल येथुन ताब्यात घेतले आहे.

अँन्टीकरप्शन ब्युरो नवी मुंबई १९८८ 7

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SUBHASH DATTATRYA KOKATE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

K.N. Jambhe [signature]

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** SUBHASH DATTATRYA KOKAT

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

[signature]

पोलीस ठाणे अंमलदार
खांदेश्वर पोलीस ठाणे
नवी मुंबई



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner